राज्यातील दूध स्वीकृती धोरण
राज्यातील जिल्हा/तालुका संघांना शितकरण प्रक्रिया इ.दर आकारणी करणेबाबत .....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.दुवियो-२०१३/प्र.क्र.८९/पदुम-९
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक :- १३ एप्रिल, २०१७

वाचा :- १. शासन निर्णय क्र.दुवियो-१००१/(२/२००१)/भाग ३, दिनांक २३ सप्टेंबर, २००२
२. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्रमांक आदुवि-९/प्रक्रीया खर्च/ २०१३/ १०८३, दिनांक १५ एप्रिल, २०१३

प्रस्तावना :- राज्यामध्ये बऱ्याच तालुका/जिल्हा दूध संघांकडे स्वत:चे शितकरण, प्रक्रिया, पॅकींग, होमोजिनायझेशन इ. यंत्रणा उपलब्ध नसल्याने संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २३ सप्टेंबर, २००२ अन्वये दूध स्विकृती धोरण राबविण्यात येते. त्यानुसार शासकीय दूध योजनेकडून तालुका/जिल्हा संघांना शितकरण, प्रक्रिया, पॅकींग, होमोजिनायझेशन इत्यादी सुविधा योग्य ती दर आकारणी करून उपलब्ध करून देण्यात येतात. वरील दरांमध्ये सन २००२ पासून वाढ करण्यात आली नव्हती. सध्याच्या परिस्थिती इंधन, वीज व आस्थापनेवरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे दूध स्विकृती धोरणांतर्गत दर वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :- राज्यातील तालुका/जिल्हा दूध संघांना शितकरण, प्रक्रिया, पॅकींग, होमोजिनायझेशन इ. करीता शासकीय दूग्धशाळेतील यंत्रणा वापरण्यासाठी पुढीलप्रमाणे दर आकारणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | दर |
|---|---|---|
| १ | शितकरण आकार | ३५ पैसे प्रति लिटर |
| २ | प्रक्रिया आकार | ७५ पैसे प्रति लिटर |
| ३ | पॅकेजिंग (१ लिटर पिशवी) | ८५ पैसे प्रति लिटर |
| ४ | पॅकेजिंग (अर्धा लिटरच्या दोन पिशव्या) | ९५ पैसे प्रति लिटर |
| ५ | प्रक्रिया व होमोजिनायझेशन (संयुक्तरित्या) | ११० पैसे प्रति लिटर |
| ६ | दूध शितगृहात ठेवणे | २० पैसे प्रति लिटर प्रति तास |

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास
यांचे कार्यालय
दिनांक 9५/8/2017

२. सदर दर आकारणी करिता पुढील प्रमाणे अटी व शर्ती विहीत करण्यात येत आहेत.

१) जिल्हा/तालुका संघांनी त्यांचेकडील दूध शासकीय दूध शितकरण केंद्र दुग्धशाळा येथे स्वखर्चाने वाहतूक करुन नेण्यात यावे व प्रक्रिया झाल्यावर स्वत: वाहतूक करुन घेऊन जावे

२) याकरिता लागणारे पॅकींग मटेरियल संघाने उपलब्ध करुन द्यावे.

३) विद्युत भारनियमत (लोड शेडींग) असतांना संघाचे दूध प्रक्रीया/थंड करून देण्यासाठी जनरेटर चालविण्याची आवश्यकता भासल्यास त्यासाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च संबंधित संघास करावा लागेल. सदर खर्च हा नियमीत दर आकारणी व्यतिरिक्त असेल. डिझेल अभावी दूधाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

४) शासकीय दूध योजनेमध्ये दुधाची हाताळणी करित असतांना संघाचे प्रतिनिधी उपस्थित असावेत तसेच दुधावर आवश्यकतेनुसार प्रक्रिया करुन देण्यात यावी.

५) संघाकडील दुधावर प्रक्रिया, पॅकेजिंग इ. करुन झाल्यावर संबंधित संघाने त्यांच्या विल्हेवाटीसाठी त्वरित दूध घेऊन जाणे बंधनकारक राहील.

६) शासकीय दुग्धशाळेमधून दूध प्रक्रिया व पॅकेजिंग करुन बाहेर गेल्यावर सदर दुधाची कुठल्याही प्रकारची जबाबदारी शासकीय दूध योजना घेणार नाही.

७) दुग्धशाळेमध्ये दुधाची हाताळणी होत असतांना १% हाताळणी घट अपेक्षित राहील.

८) संघांनी शितकरण प्रक्रिया व पॅकेजिंग संदर्भात येणारी खर्च रक्कम संबंधित योजनेकडे आगावूरित्या भरणा करावी, पॅकिंग करिता लागणाऱ्या साहित्याचा हिशोब संबंधित संघामार्फत ठेवण्यात यावा.

९) अ) जेथे सद्य:स्थितीत शासकीय दूध योजना / शीतकरण केंद्रे कार्यान्वित आहेत, तेथे ग्रामीण भागातून कमीत कमी २,००० लि. प्रतिदिन व शहर विभागाकरिता ५००० लि. दूध प्रतिदिन संघांनी प्रक्रिया करण्यासाठी आणणे आवश्यक आहे व हे दूध कमीत कमी १ महिन्याच्या सलग कालावधीकरिता आणणे बंधनकारक राहील.

ब) जेथे सद्य:स्थितीत शासकीय दूध योजना / शीतकरण केंद्रे बंद आहेत, तेथे दुग्धशाळा / शीतकरण केंद्र यांच्या स्थापित क्षमतेच्या कमीत कमी २०% दूध प्रतिदिन संघांनी प्रक्रिया करण्यासाठी आणणे आवश्यक आहे व हे दूध कमीत कमी १ वर्षाच्या कालावधीकरिता आणणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :- आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८
उप आयुक्त (प्रशासन) दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८
उप आयुक्त (वित्तीय सल्लागार) दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कोकण विभाग, नवी मुंबई/ नाशिक/ पुणे/ नागपूर/

अमरावती/ औरंगाबाद
महाव्यवस्थापक,बृहन्मुंबई दूध योजना,मुंबई / नाशिक.
सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
महाव्यवस्थापक, दुग्धशाळा व्यवस्थापक, सर्व शासकीय दूध योजना,
तालुका/जिल्हा विभागीय सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.
निवडनस्ती